पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ ५ मार्च रोजी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा दीक्षांत समारंभ दि. ५ मार्च रोजी होणार आहे. कोरोनामुळे यंदाही ऑनलाईन पद्धतीने हा सोहळा होणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे या सोहळ्याची जय्यत तयारी सुरू आहे.

गेल्या काही दिवसांपासून शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत सोहळ्याबाबत विद्यार्थ्यांमध्ये मोठी उत्सुकता होती. गतवर्षीचा दीक्षांत समारंभ ऑनलाईन झाला होता. गेल्या वर्षी दीक्षांत समारंभाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलपती तथा राज्यपाल भगतसिंह कोश्यारी होते, तर उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत व अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे चेअरमन प्रा. अनिल सहस्त्रबुद्धे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या वर्षीही राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, मंत्री उदय सामंत यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांशी कार्यक्रमाच्या आमंत्रणाबाबत चर्चा सुरू आहे. दीक्षांत समारंभाबाबत अधिक माहिती विद्यापीठ प्रशासनाकडून आठवडाभरात देण्यात येणार आहे.

06 FEB 2022

Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Shivaji University Kolhapur to hold winter exams online from Feb 14

## Mock Test On Feb 7 & 8 To Prevent Confusion

TIMES NEWS NETWORK

File photo



The mock test has been organised on the two days from 12.30 pm to 2.30 pm

**Kolhapur:** The winter examinations of the Shivaji University Kolhapur (SUK) will be conducted online from February 14.

The Shivaji University will also be conducting a mock test on February 7 and 8 to make students aware of the exact process they need to follow to register themselves for the exam with the help of usernames and passwords, apart from the other rules for the online exam.

The mock test will be conducted to avoid any confusion among the students at the last moment.

Gajanan Palse, the director of SUK's exam and evaluation department, said, "The winter exams of the university will start on February 14, 2022, and will be conducted online. A detailed schedule is available on the university's website. A demo video of the instructions and the online computer system for the students has already been posted on the university's website and all students are requested to watch it."

Before the online exam starts, a mock test has been organised on the two days from 12.30 pm to 2.30 pm.

The user IDs and passwords for this test have been sent to the students via SMS on their registered mobile numbers.

Students, who have not received the user IDs and passwords should go to the university link and click on "Get Your Password" tab to get the password on their registered email ID. Also, for any technical difficulties, the students can contact the university helpline number - 8980001249.

"In order to avoid any technical difficulty during the main examination, it is mandatory for the students to appear for the mock test to be better prepared," said the director of SUK's exam and evaluation department.

# विद्यापीठाचा यंदाचा आविष्कार संशोधन महोत्सव ऑनलाईन

## ९ फेब्रुवारीपर्यंत नोंदणीचे आवाहन; संशोधन प्रकल्पांची सहा शाखांमध्ये विभागणी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठामार्फत यंदाचा आविष्कार संशोधन महोत्सव ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे. नोंदणीची अंतिम मुदत ९ फेब्रुवारी आहे. महोत्सवात विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालयांतील विद्यार्थी व शिक्षक संशोधन सादर करू शकतात, अशी माहिती समन्वयक डॉ. एस. बी. महाडिक यांनी दिली.

महोत्सवात सहभागाचे पदवी, पदव्युत्तर, एम.फिल., पीएच.डी. साठी प्रवेशित असणारे विद्यार्थी आणि एम.फिल., पीएच.डी.साठी प्रवेशित असणारे महाविद्यालयीन व विद्यापीठीय मान्यताप्राप्त शिक्षक असे स्तर असणार आहेत. महोत्सवात सादर करण्यात येणाऱ्या संशोधन प्रकल्पांची मानव्यविद्या, भाषा, . ललितकला, वाणिज्य, व्यवस्थापन, कायदा, केवल विज्ञान, कृषी व पशुपालन, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान आणि वैद्यक व औषध निर्माण या सहा शाखांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. विद्यार्थी, शिक्षक यांची कोणतीही शाखा असली तरी ते अन्य शाखेंतर्गतही संशोधन सादर करू शकतात.

पदवी स्तरासाठी प्रथम फेरी जिल्हास्तरावर घेण्यात येईल. कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांसाठी फेरीचे आयोजन न्यू कॉलेज (कोल्हापूर), विलिंग्डन कॉलेज (सांगली) व दहिवडी कॉलेज (दहिवडी) या महाविद्यालयांमार्फत केले जाईल.

प्रथम फेरीतून निवडलेल्या पदवी स्तरातील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठस्तरीय फेरीचे आयोजन संगणकशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्यामार्फत घेण्यात येईल. इतर तीन स्तरांसाठी महोत्सव थेट विद्यापीठ स्तरावरच संगणकशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ यांच्यामार्फत होईल. महोत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले आहे.

लोकमत

# विद्यार्थीदशेत वैचारिक बैठक हवी : शरद बाविस्कर

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विद्यार्थ्यांनी समाजाचा डोळसपणे अभ्यास करून आपली वैचारिक बैठक पक्की करण्यास प्राधान्य द्यावे आणि समाज प्रश्नावर व्यक्त व्हावे, असे मत 'भुरा' या प्रसिद्ध आत्मकथनाचे लेखक डॉ.शरद बाविस्कर यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी विभागातर्फे आयोजित 'मीट द ऑथर' या ऑनलाइन उपक्रमांतर्गत ते शनिवारी बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के होते. डॉ.बाविस्कर म्हणाले, माझ्या वाट्याला जे संघर्षमय आयुष्य आले, ते इतर विद्यार्थ्यांच्या आयुष्यात येऊ नये. या संघर्षातून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी पुढील वाटचाल निश्चित करावी, या हेतूने आत्मकथन लिहिण्यास प्रवृत्त झालो. कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के म्हणाले, आयुष्यात येणाऱ्या संकटांसमोर न खचता पुढे जाण्याची प्रेरणा आत्मकथने व चरित्र देतात. विद्यार्थ्यांनीही भौगोलिकच नव्हे, तर वैचारिक शिवारही सोडून त्याच्या पलीकडचे विश्व कवेत घेण्याचा प्रयत्न करावा.

पुढारी

# विद्यार्थिदशेत वैचारिक बैठक पक्की करावी : डॉ. बाविस्कर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांनी समाजाचा डोळसपणे अभ्यास करून या दशेत वैचारिक बैठक पक्की करण्यास प्राधान्य द्यावे. त्यानंतर समाजाच्या प्रश्नांवर व्यक्त व्हावे, असे मत 'भुरा' या प्रसिद्ध आत्मकथनाचे लेखक डॉ. शस्द बाविस्कर यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागातर्फे आयोजित 'मीट द ऑथर' ऑनलाईन उपक्रमांतर्गत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. डॉ. बाविस्कर म्हणाले, माझ्या वाट्याला जे संघर्षमय आयुष्य आले, ते इतर विद्यार्थ्यांच्या आयुष्यात येऊ नये. संघर्षातून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी पुढील वाटचाल निश्चित करावी, या हेतूने आत्मकथन लिहिण्यास प्रवृत्त झालो. कदाचित या सकारात्मक प्रेरणांमुळेच अडीच



महिन्यांत लिहून झालेले हे आत्मकथन गाजत असल्याचे समाधान आहे.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, कोणत्याही संकटासमोर न खचता आयुष्यात पुढे जाण्याची प्रेरणा आत्मकथने व चरित्रे देत असतात. विद्यार्थ्यांनी केवळ भौगोलिकच नव्हे, तर वैचारिक 'शिवार'ही सोडून त्यापलीकडील विश्व कवेत घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. इंग्रजी अधिविभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. प्रमोद पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी आभार मानले.

पुढारी

# संशोधन समाजोपयोगी असावे : प्रा. राजन गवस

## दिल्लीत मराठी भाषा, साहित्य संशोधन पद्धत कार्यशाळा

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

संशोधनासाठी एक सूत्र गवसणे महत्त्वाचे असते. या सूत्राचा शोध साधनांच्या शोधापासून सुरू होतो. साधनाची पुढे प्रतवारी लावली जाते; पण मुळात संशोधन समाजोपयोगी असावे, असे प्रतिपादन मराठीतील प्रख्यात साहित्यिक तथा साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित डॉ. राजन गवस यांनी केले.

साहित्य अकादमी, केंद्रीय अनुदान आयोग, मानव संसाधन विकास केंद्र आणि अलिगड मुस्लिम केंद्रीय विद्यापीठ तसेच आधुनिक भारतीय भाषा संकुलातील मराठी विभागातर्फे सातदिवसीय ऑनलाईन 'राष्ट्रीय मराठी भाषा व साहित्य संशोधन पद्धत' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. तिचे उद्घाटन डॉ. गवस यांच्या हस्ते झाले, याप्रसंगी ते बोलत होते.

अतिथी म्हणून कुलगुरू तारिक मन्सूर तसेच यूजीसी-मानव संसाधन विकास केंद्राच्या संचालिका डॉ. फैझा अब्बासी उपस्थित होत्या. कार्यशाळेचे प्रास्ताविक मुख्य आयोजक तथा मराठी विभागाचे प्रभारी डॉ. ताहेर पठाण यांनी केले. आधुनिक भारतीय भाषा विभागाचे प्रा. क्रांती पाल यांनी स्वागत केले. प्रा. मुश्ताक अहमद झरगर यांनी आभार मानले. कार्यशाळेत महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, उत्तर प्रदेश आणि दिल्ली या राज्यांतील संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक व संशोधक मार्गदर्शक यांनी सहभाग घेतला होता.

डॉ. अविनाश आवलगावकर, डॉ. प्रभाकर देसाई, डॉ. दासू वैद्य, डॉ. कैलाश अंभुरे, डॉ. चंद्रकांत वाघमारे, डॉ. आशुतोष पाटील, डॉ. सुधाकर शेलार, डॉ. शैलेंद्र लेंडे, डॉ. वंदना महाजन, डॉ. अनिल सपकाळ, डॉ. सुनील रामटेके, डॉ. मनोज तायडे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. पृथ्वीराज तौर, डॉ. शिवाजी हुसे, डॉ. राम रौनेकर, डॉ. निशिकांत मिरजकर या तज्ज्ञ अभ्यासकांनी कार्यशाळेत व्याख्याने दिली.

पुढारी

# डॉ. संजय चव्हाण यांना 'सर्ब'चा ३१ लाख रुपयांचा प्रकल्प मंजूर

## केंद्रीय मंडळाकडून मंजुरी; संशोधनास मदत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. संजय चव्हाण यांना केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयांतर्गत (डीएसटी) असलेल्या सायन्स अँड इंजिनिअरिंग रिसर्च बोर्ड (SERB- सर्ब) यांच्याकडून ३१ लाख २० हजार रुपयांचा संशोधन प्रकल्प मंजूर झाला आहे. केंद्रीय मंडळाकडून शनिवारी त्यांना मंजुरीचा ई-मेल प्राप्त झाला.

डॉ. चव्हाण यांनी 'डिझाईन अँड सिंथेसिस ऑफ कार्बन-रिच अल्कीनिल फंक्शनलाईज्ड ट्रांझिशन मेटल कॉम्प्लेक्सेस फॉर देअर लुमिनिसेन्स अँड नॉन लिनिअर ऑप्टिकल प्रॉपर्टीज' या विषयावरील प्रकल्प प्रस्ताव भारत सरकारच्या 'सायन्स अँड इंजिनिअरिंग रिसर्च बोर्ड' यांना सादर केला होता. या ३१ लाख २० हजार रुपयांच्या संशोधन प्रकल्पाला मंजुरी मिळाली आहे.



शिवाजी विद्यापीठातून...

विद्यापीठास नुकताच डीएसटी-स्तुती उपक्रमांतर्गत २.५ कोटी रुपयांचा प्रकल्प प्राप्त झाला आहे. डीएसटी-फिस्ट, डीएसटी-पर्समधून विविध संशोधन प्रकल्प विद्यापीठातील विविध अधिविभागांना मंजूर झालेले आहेत. डॉ. चव्हाण यांनी आजपर्यंत यूजीसी, डीएसटी व सर्ब यांचे पाच विविध संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत. भारत व ऑस्ट्रेलिया यांच्या संयुक्त संशोधन कार्यक्रमांतर्गत ऑस्ट्रेलिया - इंडिया स्ट्रॅटेजिक रिसर्च फंड अंतर्गत प्रख्यात ऑस्ट्रेलियन शास्त्रज्ञांसह रामन रिसर्च इन्स्टिट्यूट, बंगलोर आणि हैदराबाद केंद्रीय विद्यापीठातील शास्त्रज्ञांसमवेत विविध संशोधन प्रकल्पांवर काम केले आहे. डॉ. चव्हाण यांना अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

सकाळ

# प्रा. डॉ. चव्हाण यांना केंद्राची ३१ लाख शिष्यवृत्ती

## डीएसटी, सर्बकडून प्रकल्पास मंजुरी


डॉ. चव्हाण

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. संजय चव्हाण यांना केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाअंतर्गत (डीएसटी) सायन्स अँड इंजिनिअरिंग रिसर्च बोर्ड (सर्ब) यांच्याकडून ३१ लाख २० हजार रुपयांचा संशोधन प्रकल्प मंजूर झाला आहे. केंद्रीय मंडळाकडून आज त्यांना मंजुरीचा ई-मेल प्राप्त झाला.

डॉ. चव्हाण यांनी 'डिझाईन अँड सिन्थेसिस ऑफ कार्बन-रिच अल्कीनिल फंक्शनलाइज्ड ट्रांझिशन मेटल कॉम्प्लेक्सेस फॉर देअर लुमिनिसेन्स अँड नॉन-लिनिअर ऑप्टिकल प्रॉपर्टीज' विषयावरील प्रकल्पाचा प्रस्ताव भारत सरकारच्या 'सायन्स अँड इंजिनिअरिंग रिर्सच बोर्ड' यांना सादर केला होता. या ३१ लाख २० हजार रुपयांच्या संशोधन प्रकल्पाला मंजुरी मिळाली आहे.

विशेष म्हणजे विद्यापीठाला नुकताच डीएसटी-स्तुती उपक्रमांतर्गत २.५ कोटी रुपयांचा प्रकल्प प्राप्त झाला आहे. त्याचबरोबर डीएसटी-फिस्ट, डीएसटी-पर्स आदी उपक्रमांतर्गतही विविध संशोधन प्रकल्प विद्यापीठातील विविध अधिविभागांना मंजूर झाले आहेत.